**साक्षीदार क्र. १**

ची साक्ष शपथेवर सुरु

नि.फौ.प्र.क्र. ५२२/२०१९

सरकार ..वि. रविंद्र

**नि.क्र. १७**

**नाव – रविंद्र दादारावजी विंचुरकर,**

वय – ३५ वर्षे, धंदा –सलुन दुकान,

रा. शिरजगाव कसबा, ता. चांदुर बाजार , जि. अमरावती

**सरतपासणी करीता सरकारतर्फे सहा. सरकारी वकिल कु. आर. एस. श्रीराव यांच्या मार्फत**

१. मी आरोपीला ओळखतो. मला पोलीसांनी पंचनाम्यासाठी देउरवाडा रस्त्यावरील आकोटकर यांच्या शेताजवळ बोलविले होते. त्याठिकाणी पोलीसांनी लिखापढी करुन पंचनाम्याची कार्यवाही केली होती. आता मला पंचनामा दाखविण्यात आला. हा तोच आहे. त्यावर माझी सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. **पंचनाम्यास नि.क्र.१८** देण्यात आला. पंचनामा अपघात झाल्या संदर्भात करण्यात आला होता.

**आरोपीतर्फे उलटतपास : श्री. गोमकाळे वकील यांच्यामार्फत** –

२. पंचनाम्यास बोलविण्यासाठी मला पोलीसांनी लेखी नोटीस दिली नाही. घटना कुठल्या दिवशी घडली होती हे मला सांगता येणार नाही. घटनास्थळ पोलीसांना कोणी दाखविले होते हे मला माहीत नाही. घटना प्रत्यक्षात कुठे घडली होती हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांच्या व्यतिरीक्त तेथे कोणीही हजर नव्हते. फिर्यादीला मी ओळखतो. तो माझे चांगल्या परिचयाचा आहे. आम्ही दोघेही मागील दोन तारखेपासुन एकत्र येत आहोत. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीच्या सांगण्यावरुन मी आज रोजी साक्ष देत आहे. पंचनाम्यामध्ये सविस्तर काय लिहीले आहे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, पंचनामा पोलीसांनी तयार करुन ठेवला होता व मला सही करण्यास सांगितल्याने मी सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझे सरतपासातील सांगितलेला संपुर्ण मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला, फेरतपास काही नाही.**

सा.वा.दा.ब.अ.क.केले.

समक्ष,

**(जी. बी. नंदागवळे )**

प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,

न्या.क्र.२, चांदूर बाजार

**दिनांक ११.१०.२०२४**